# भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रकरण २१ अन्वये कलम २७४ अन्वये
# संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १००/२०२५ चा अभिलेख
## मालवण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

**निशाणी**

१) अपराध घडल्याचा दिनांक : १७/०५/२०२५

२) फिर्याद दाखल केल्याचा दिनांक : १७/०५/२०२५

३) फिर्यादीचे नाव, वय व पत्ता : संभाजी नारायण गावडे, वय ४० वर्षे,
धंदा– नोकरी, पोहेकॉ ३७७
नेमणुक– आचरा पोलीस ठाणे, जि. सिंधुदुर्ग.

४) आरोपीचे नाव, वय व पत्ता : प्रशांत प्रभाकर नाईक,
वय– ४८ वर्षे, धंदा – शेती
रा. आचरा भंडारवाडी, ता.मालवण,
जि.सिंधुदुर्ग

५) अपराधाचा तपशील :

तुम्ही दि. १७/०५/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास मौजे आचरा तिठा येथील तेजस हार्डवेअरच्या समोरील मुंबई पाणीपुरी सेंटरच्या शेजारील टपरीच्या पाठीमागे स्वतःचे फायद्यासाठी, कल्याण मटका नावाच्या जुगाराचे आकड्यावर सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे स्विकारुन जुगार खेळ खेळवित असताना, जुगाराचे साहित्य व रोख रकमेसह मिळून आला व त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र जुगार अधिनियम कायदा कलम १२(अ) द्वारे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला आहे.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : अभियोग पक्षाच्या कागदपत्रांच्या प्रती तुम्हाला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : अपराधाचा जो तपशील तुम्हाला वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा मान्य आहे काय ?

उत्तर : मला गुन्हा मान्य नाही.

-----------------

दिनांक : २८/११/२०२५ (आरोपीची सही )

समक्ष,

( एम.के.फकीह )
न्यायदंडाधिकारी वर्ग-१, मालवण

आरोपीला गुन्हयाबाबतचा तपशिल वाचून दाखविला व मराठीतून समजावून सांगितला असता आरोपीने गुन्हा नाकबूल करुन अभियोग चालविण्याची तयारी दर्शविली.

( एम.के.फकीह )
दिनांक : २८/११/२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग-१, मालवण